आ. डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या कडून

# लोकलेखा समिती

## (२०१५-२०१६)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ चा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१), शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२), वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४), उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.५), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.६) व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.८)

## एकोणीसावा अहवाल

Scanned by CamScanner

## लोकलेखा समिती
## २०१५-२०१६

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

*(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

***(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(२४अ) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

***भास्कर जाधव, वि.स.स., दिनांक २२ मार्च २०१७ पासून ते दिनांक ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत निलंबन.**

****श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर २०१६ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

*****श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी उप सभापती, विधानपरिषद या पदावर निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

Scanned by CamScanner

# प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ चा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१), शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२), वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४), उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.५), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.६) व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.८) यावर विचार करून लोकलेखा समितीचा एकोणीसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २७ व २८ जानेवारी, २०१६, दिनांक १० फेब्रुवारी, २०१६, दिनांक १ व ३ मार्च, २०१६, दिनांक २७ एप्रिल, २०१६, दिनांक ३, ११ व ३१ मे, २०१६, दिनांक १, ७, ८, १४ व १५ जून, २०१६ तसेच दिनांक १० व २४ ऑगस्ट, २०१६ रोजी अपर मुख्य सचिव, गृह व वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग व प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, गृह, नगरविकास, उच्च व तंत्र शिक्षण, गृहनिर्माण व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट ' अ ' मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट ' ब ' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १ व ९ मार्च, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

**विधान भवन,**
मुंबई/नागपूर.
दिनांक : १५ मार्च २०१७.

५.८२
5.83

Scanned by CamScanner

## अभिप्राय व शिफारशी

**१.२६६ महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग :—**

विविध कायद्यांतर्गत बालकांना मिळणा-या हक्काचे संरक्षण व त्यासंबंधी तपासणी करण्याकरिता तसेच त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारस करणे, बालसंरक्षणाचे उल्लंघन होत असल्यास त्याची चौकशी करणे व कायदेशीर कारवाईकरिता शिफारस करणे यासाठी M.S.C.P.C.R. ची स्थापना जुलै, २००७ मध्ये झाली. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र शासनाने केवळ डिसेंबर, २००८ व जानेवारी, २००९ मध्ये ३ वर्षासाठी अनुक्रमे अध्यक्ष व सहा सदस्य यांना नामनिर्देशित केले. तीन सत्रांच्या अखेरीस डिसेंबर, २०११ मध्ये प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांना आयोगाच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त भार देण्यात आला होता. परंतु एकाही नवीन सदस्यास नामनिर्देशित करण्यात आले नव्हते. राज्य शासनाने गठीत करावयाच्या त्रीसदस्यीय निवड समितीद्वारे M.S.C.P.C.R. च्या अध्यक्षांची निवड करणे आवश्यक होते. तथापि, सदर पद्धत अवलंबिण्यात आली नाही, ज्यांच्याकडे पालकांच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी होती तेच प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कायद्याचे संनियंत्रण करणे, कायद्यांतर्गत आदेश जारी करणे किंवा शिफारस करणे. या त्यांच्या भुमिकेला न्याय देऊ शकले नसते. त्यामुळे प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक करणे नियमानुसार नव्हते. तसेच आयोग गठीत झाल्यापासून नोव्हेंबर, २०१४ पर्यंत विधी सल्लागारांची सेवा पुरविण्यात आली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले आहेत. यासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २०१२ मध्ये त्रिसदस्यीय समितीने मुलाखती घेतल्या होत्या. परंतु त्यावेळी नेमणूक देण्याबाबत कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत व सदर नियुक्ती संदर्भात पुन्हा जाहिरात देण्याविषयी आदेश प्राप्त झाल्यामुळे पुन्हा नव्याने जाहिरात देण्यात आल्या होत्या. सद्य:स्थितीत विभागाकडे अर्ज प्राप्त झालेले आहे. अर्ज छाननीची कार्यवाही सुरू आहे. तद्नंतर मा.मंत्री तथा अध्यक्ष यांना संपूर्ण माहिती देण्यात येईल व पुढील कार्यवाही करण्यात येईल. कायदा सल्लागाराची गेल्या ७ वर्षापासून नियुक्ती न करण्याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, मा.न्यायालयाने २ ते ३ अधिका-यांची नावे सुचविली होती. परंतु संबंधित अधिकारी काम करण्यास इच्छुक नव्हते. तसेच विधी अधिकारी हे अवर सचिव दर्जाचे पद होते. परंतु आयोगाने ही पोस्ट upgrade करून District Judge दर्जाचे अधिकारी देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. यासंदर्भात विधी व न्याय विभागाच्या सचिवांनाही साक्षीस बोलविण्यात आले व त्यांची भुमिका विशद करणेबाबत सुचित केले असता विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी स्पष्ट केले की, महिला व बालविकास विभागाकडून दिनांक २८ एप्रिल २०११ रोजी विनंती करण्यात आली होती. परंतु विभागाकडे अधिकारी उपलब्ध नव्हते. तद्नंतर दिनांक १७ सप्टेंबर २०१२ रोजी विनंती करण्यात आली होती की त्या पदावर न्यायीक अधिकारी प्रतिनियुक्तीवर द्यावा. त्यानुसार उच्च न्यायालयाने दिनांक ३ नोव्हेंबर २०१२ रोजी न्यायिक अधिकारी श्री. एस.एस.अग्रवाल, अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली. परंतु श्री. अग्रवाल यांची वेतनश्रेणी उच्च असल्याने मूळ पदाचे अपग्रेडेशन करावे लागत होते. ते होऊ शकले नाही. **यासंदर्भात समितीने निर्देश दिले की, सन २०११ पासून २०१६ पर्यंत केवळ अधिका-यांची नियुक्ती न झाल्यामुळे कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी होऊ शकली नाही ही गंभीर बाब आहे. बालकांना मिळणा-या हक्कांचे संरक्षण, त्यासंबंधी तपासणी व सदर कायदा अंमलबजावणीसाठी आवश्यक शिफारशी तसेच बालसंरक्षणाचे उल्लंघन होत असल्यास त्याची चौकशी व कायदेशीर कार्यवाही या बाबी गेल्या ५-६ वर्षे होऊ शकल्या नाहीत, ही बाब शासनाच्या दृष्टीने निश्चीतच भूषणावह नाही. महिला व बालविकास विभाग व विधी विभागाने सदर नेमणूकीबाबत योग्य समन्वय साधून व आवश्यक तो पाठपुरावा करून महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग गठीत करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही हे खेदाने नमूद करण्यात येत आहे. महिला व बालविकास विभाग व विधी व न्याय विभाग यांनी सदर समिती गठीत करणेबाबत आवश्यक सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची समाधानकारक माहिती वित्त विभागास सादर करून एक महिन्यात महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे परिपूर्ण गठण करून सदर आयोगाचे कामकाज परिणामकारकरित्या सुरू करण्यात यावे तसेच ज्या अधिका-यांची (कितीही वरिष्ठ अधिकारी असले तरीही) ही पदे भरण्याची व अपग्रेड करण्याची जबाबदारी होती ती पार पाडण्यास ते अपयशी ठरले आहेत अशा सर्व अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. व तसा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**१.२६७ महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था :—**

सर्व लहान मुलांपर्यंत विशेषत: हलाखीच्या परिस्थितीत मुलांपर्यंत योजनेचे फायदे पोहचावेत यासाठी केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाने सन २००९ मध्ये एकात्मिक बालविकास संरक्षण योजना (I.C.P.S.) नावाच्या एका केंद्र शासन पुरस्कृत योजनेखाली त्यांच्या विद्यमान सर्व बालसंरक्षण योजना एकत्रित केल्या. केंद्र शासनाबरोबर माहे नोव्हेंबर, २०१० मध्ये केलेल्या MOU. नुसार राज्य शासनाने तीन महिन्यात राज्य बाल हक्क संस्था, राज्य दत्तक स्रोत संस्था (S.A.R.A.) आणि जिल्ह्यांमध्ये विशेष बाल गुन्हेगार पोलीस दल (S.T.P.U.) गठीत करावयाचे होते. तसेच ६ महिन्यात म्हणजेच फेब्रुवारी, २०११ पर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्ष (D.C.P.U.) आणि विशेष दत्तक संस्था (S.S.A.) स्थापन करावयाचे होते. तथापि, लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, राज्य जिल्हा व क्षेत्रिय पातळीवरील संस्थांची

Scanned by CamScanner

स्थापना करण्यास विलंब झालेला होता. त्यामुळे संस्था स्थापण्याचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण होऊ शकले नाही. यासंदर्भात लोकलेखा समितीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, गाव पातळीवर एकूण ३९,००० समित्या स्थापन करावयाच्या आहेत. यामध्ये १८,५६५ समित्या स्थापन केलेल्या आहेत. उर्वरीत ५०% पेक्षा जास्त समित्या स्थापन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. गाव पातळीवरील समित्या स्थापन केल्यानंतर प्लान्स तयार होणार आहेत. जिल्हा आणि तालुका स्तरावरील काही समित्या स्थापन झालेल्या असून सद्य:स्थितीमध्ये प्लानचे काम प्रगतीपथावर आहे. याबाबत समिती शिफारस करीत आहे की, **राज्य शासनाने केंद्र शासनासोबत केलेल्या MOU नुसार विभागाने गाव, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील उर्वरीत समित्या तातडीने गठीत कराव्यात व कायद्यातील तरतूदीनुसार अपेक्षित कार्यवाही करून राज्यातील विशेषतः हलाखीच्या परिस्थितीत मुलांपर्यंत योजनेचा लाभ पोहचवावा. सर्व स्तरावरील समिती गठीत करणेबाबतची कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करावी. तसेच राज्य शासनाने केंद्र शासनासोबत केलेल्या MOU ची अंमलबजावणी करण्याची ज्या अधिका-यांची जबाबदारी होती त्यांनी ती जबाबदारी पार पाडली नाही असे महत्वाचे विषय हाताळण्याबाबत अधिकारी गंभीर नाहीत याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सदर अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**बालकांचे जीवन सातत्य :-**

**१.२६८** जन्म घेणे व जीवंत राहणे हा प्रत्येक बालकाचा अनन्य संक्राम्य अधिकार आहे. सन २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत लेखा परीक्षकांना २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील बालकांमध्ये लिंग गुणोत्तर (C.S.R.) घट झाल्याचे आढळून आले याशिवाय राज्यातील १७% शाळांमध्ये हा कार्यक्रम राबविला जात नव्हता, योग्य दस्तऐवज बाळगले जात नव्हते, शाळा स्तरावर संनियंत्रण केले जात नव्हते त्यामुळे समाजातील बालकांविषयी असलेल्या लिंगभेदास दूर करण्यासाठी उपाययोजनांना चालना देण्यासाठी तोडगा काढणे आवश्यक असल्याचे महालेखापालांनी आक्षेपात नमूद केले. या संदर्भात विभागीय सचिवांनी सादर केले की PCPNDT हा कायदा सन १९९४ पासून राज्यामध्ये चांगल्या पद्धतीने राबविला जात आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने २००० पेक्षा जास्त सक्षम प्राधिका-यांच्या नियुक्त्या (approproate authority) केल्या आहेत. त्यांच्यामार्फत नियमीत व त्रैमासिक सोनोग्राफी केंद्राची तपासणी केली जाते. विभागाने ५५० कोर्ट केसेस दाखल केल्या आहेत. ४८ डॉक्टरांच्या नोंदणी रद्द केलेल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्यात घ्क्घ्क्र च्या अंमलबजावणी बद्दल चांगले अभिप्राय दिले असून अन्य राज्यांनी महाराष्ट्र प्रमाणे कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत सन २०१० मध्ये लींगोत्तर प्रमाण ८५४ एवढा होता सन २०११ मध्ये ८६१ तर सन २०१४ मध्ये ९१९ अशी वाढ लींगोत्तर प्रमाणात झाल्याचे दिसून येते. यासंदर्भात समितीमध्ये चर्चा करताना मीना राजू या योजनेच्या माध्यमेतून लिंग गुणेत्तर प्रमाणात मोठे आंदोलन केले होते. काही डॉक्टर्स, रेडिओलॉजिस्ट यांचे मशीन जप्त करण्यात आले होते तर काही डॉक्टरांचे सोनोग्राफी मशीन जप्त केले नव्हते त्यामुळे डॉक्टरांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता. यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, त्या कायद्यांच्या तांत्रिक बाबींच्या कठोर अंमलबजावणी संदर्भात शासनास कोणत्याही प्रकारच्या स्पष्ट गाईड लाइन्स प्राप्त झालेल्या नाहीत. हा कायदा मूळतः केंद्र शासनाचा असून त्यामध्ये राज्य शासनाने काही अंशी बदल केलेला आहे. यासंदर्भात समितीने सूचीत केले की मूला मुलींचे गुणोत्तर प्रमाण हा समाजातील अत्यंत गंभीर प्रश्न असून विभागाने सादर केलेल्या आकडेवाडीनुसार गुणोत्तर प्रमाणामध्ये वाढ झालेली असली तरी कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात अनेक त्रुटी आहेत. यासंदर्भात विधानसभेमध्ये चर्चा झालेली असून सन्माननीय सदस्यांनी अनेक सूचना केलेल्या आहेत. ज्यावेळी आई वडिल अशा प्रकारची सोनोग्राफी करण्याकरिता येतात त्याचवेळीस त्यांची सक्तीने लिंग चाचणी करून सदरहू जोडपे पूढील चाचणीकरीता येतील त्याबाबत स्थानिक क्षेत्रातून मागोवा ठेवणे, एखाद्या जोडप्यांच्या तपासणीमध्ये मुलगी असल्याचे कळल्यानंतर तपासणीकरीता येणे बंद झाल्यास सदर जोडप्यांच्या घरी जाऊन मागोवा घेणे आवश्यक आहे. **सदर कायद्यानुसार केवळ डॉक्टरांवर कारवाईची तरतूद असल्याने आई वडीलांवर धाक ठेवण्यात आलेला नाही. परंतू मुलींचा रेशो वाढविण्याकरीता आई वडिलांकरिताही कायद्याचा धाक निर्माण करणे आवश्यक आहे. डॉक्टर, आईवडिल व जिल्हा आरोग्य अधिकारी (DHO) तसेच NGO यांना सोनोग्राफी ट्रॅक प्रक्रियेमध्ये सहभागी केले तर कायद्याचा धाक बसेल अशा आशयाचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला तर स्त्रीभ्रूण हत्या कमी होण्यास मदत होईल. अशी समितीची शिफारस आहे. विभागाने या संदर्भात योग्य व व्यावहारिक प्रस्ताव केंद्र शासनास सादर करावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**१.२६९ लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ ची अंमलबजावणी :-**

केंद्र शासनाने लैंगिक अत्याचार, लैंगिक शोषण व अश्लिल वर्तन यापासून १८ वर्षाखालील बालकांचे रक्षण करण्यासाठी तसेच अशा गुन्ह्यासंबंधी आणि गुन्ह्याशी निगडीत बार्बीवर सुनावणी होण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ (POCSO) जून, २०१२ मध्ये अंमलात आणला. कायद्यातील तरतूदीनुसार राज्याने प्रत्येक जिल्ह्यात विशेष न्यायालयाची स्थापना करणे व विशेष सरकारी अभियोक्ता निवडणे आवश्यक होते. राज्यात सन २०१० मध्ये बलात्काराच्या १६१० घटना घडल्या होत्या ज्यामध्ये वाढ होऊन २०१३ मध्ये ३०६३ घटनांची नोंद झाली होती. परंतू या कालावधीत नोंदी झालेल्या घटनांपैकी सिद्ध झालेल्या गुन्ह्याचे प्रमाण १३.९ ते २०.३% होते POCSO हा कायदा सन २०१२ मध्ये लागू होऊनही विशेष न्यायालयात प्रकरणांची सुनावणी होण्यासाठी सर्व



Scanned by CamScanner